# छात्र प्रबोधनच्या स्पर्धा व उपक्रमांचा संक्षिप्त आढावा

१. **बोरिवली दशकपूर्ती कार्यक्रम –** बोरिवली येथील उपक्रम केंद्राला जानेवारी २००७ मध्ये १० वर्षं पूर्ण झाली. त्यानिमित्तानं गेल्या वर्षभरात विद्यार्थी, पालक, शिक्षक, युवक गट व कार्यकर्ते गट यांच्यासाठी एकूण मिळून १० कार्यक्रमांचे आयोजन केले होते. ज्ञान प्रबोधिनीचे मा. संचालक वा. गिरीशराव बापट यांच्या उपस्थितीत युवक मेळावा व मातृभूमिपूजन कार्यक्रमाने या दशकपूर्ती कार्यक्रमांची सांगता झाली.

२. **संपादकांचे दौरे –** डोंबिवली, बोरिवली, शिरपूर, नंदूरबार, मालेगाव, नाशिक, संगमनेर, कोपरगाव, चिपळूण, रत्नागिरी, सानपाडा, चाकण, गोरेगाव, बांद्रा येथे संपादकांचे दौरे झाले. त्यात सभासदांचे मेळावे, पालक सभा, शिक्षक संवाद, मान्यवरांच्या भेटी व कार्यकर्त्यांच्या बैठकी इ. कार्यक्रम झाले.

३. **वाचक मेळावे –** यावर्षी पहिल्यांदाच दिवाळी अंकाच्या वाचकांचे मेळावे झाले. २० गावांमध्ये झालेल्या मेळाव्यांमध्ये दिवाळी अंकातील साहित्यावर चर्चा, सादरीकरण, स्पर्धा, प्रकट वाचन, कृती इ. गोष्टींचा समावेश होता. सर्व ठिकाणी मिळून १००० विद्यार्थी उपस्थित होते.

४. **स्पर्धा –** 'तुम्हीच संपादक व्हा' या हस्तलिखित स्पर्धेमध्ये यावर्षी किशोर, कुमार व इंग्रजी गट मिळून ४० गटांनी (५०० विद्यार्थी) भाग घेतला. त्यातील २५ हस्तलिखिते विशेष गुणवत्ता प्राप्त होती. 'सर्वेक्षण अहवाल लेखन' स्पर्धेत ८ गटांनी भाग घेतला. स्पर्धांमधील क्रमांकप्राप्त गटांतील विद्यार्थ्यांना पुस्तकरूपाने ५००० रुपयांची बक्षिसे देण्यात आली. (वृत्त अंक ७ व ८ मध्ये)

५. **अभियान –** कॉपी विरोधी अभियानांतर्गत सुमारे ४०० शाळांमध्ये मान्यवरांचे संदेश असलेली भित्तीपत्रके लावण्यात आली. विविध वृत्तपत्रांमध्येही याची बातमी प्रसिद्ध झाली होती.

६. **साहस सहली –** १५ ते २० एप्रिल २००८ मध्ये युवकांसाठी 'कळसुबाई–रतनगड–हरिश्चंद्रगड' येथे गिरिभ्रमण सहल झाली. यामध्ये १८ युवक सहभागी झाले होते. (वृत्त अंक ९ मध्ये)

७. **नेतृत्व संवर्धन शिबिर –** २३ ते २९ एप्रिल २००८ दरम्यान मुला–मुलींसाठी नेतृत्व संवर्धन शिबिर घेण्यात आले. शिबिरातील पहिले ४ दिवस प्रबोधिनीत तर उर्वरित २ दिवस वेल्हे तालुक्यातील ८ गावांमध्ये २० ते ४० विद्यार्थ्यांची शिबिरे या विद्यार्थ्यांनी घेतले. (वृत्त अंक ९ मध्ये)

८. **व्यक्तिविकसन शिबिर –** मालेगाव केंद्रांमध्ये ५ वी ते ८ वीच्या मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर घेण्यात आले. शिबिराला ६५ मुलींचा चांगला प्रतिसाद मिळाला. कथाकथन, प्रकट मुलाखत, पाककृती, प्रकल्प भेट, संवाद लेखन इ. सत्रे या शिबिरात झाली. अंकातील आवाहनावरून ५ गावांमध्ये विद्यार्थ्यांनी ३ ते ५ दिवसांची व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे घेतली. (वृत्त अंक ९ व १० मध्ये)

९. **लेखन कार्यशाळा –** २ मे ते ४ मे २००८ च्या दरम्यान ८वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ३ दिवसांच्या या कार्यशाळेत पुण्यातील व पुण्याबाहेरील मिळून २५ विद्यार्थी उपस्थित होते. ललित लेखन आणि कथा या साहित्य प्रकारांवर तज्ज्ञ लेखकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. (वृत्त अंक ९ मध्ये)

१०. **पदव्युत्तर युवक–युवती बैठक –** २९ जून रोजी या विशेष बैठकीला ४२ जणांची उपस्थिती होती. मा. विवेकराव कुलकर्णी यांनी 'देशपरिस्थिती– काल–आज–उद्या आणि मी' यासंबधी विस्तृत पट मांडला.

११. **उपक्रम केंद्रांवरील कार्यक्रम –** बोरिवली, डोंबिवली, गिरगाव, रसायनी, नंदुरबार, सांगली या केंद्रांतर्फे नियमित वा प्रासंगिक उपक्रम, शिबिरे, मेळावे, अभ्यासहली इ. कार्यक्रम चालू होते.



वाचलेच पाहिजे असे काही... जिद्दीच्या कथा!
**आयुष्यातील वादळलाटा - संपा. नीलिमा करमरकर**

Those who wish to sing
always find a song